## सहायक अभियंता (विद्युत) श्रेणी-२, महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा, गट-ब

**१. पदांचा तपशील** :

**१.१ संवर्ग** : राजपत्रित, गट - ब.

**१.२ नियुक्तीचे ठिकाण** : राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात.

**१.३ वेतनबँड, ग्रेड वेतन व बढतीच्या संधी** : रुपये ९३००-३४८००,४४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. ज्येष्ठता व पात्रतेनुसार विद्युत अभियांत्रिकी सेवेतील वरिष्ठ पदावर.

**१.४ शासनाच्या** मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील,पदसंख्या, आरक्षण इत्यादी जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**२. परीक्षेचे टप्पे** :

२.१ प्रस्तुत परीक्षा खालील टप्प्यात घेण्यात येते :-

(**एक**) पूर्व परीक्षा - १५० गुण. (**दोन**) मुख्य परीक्षा - ६०० गुण. (**तीन**) मुलाखत - १०० गुण

२.२ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी घेण्यात येते. या करीता पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते. पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणारी नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

२.३ मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतात.

२.४ जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**३.अर्हता** :

३.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

३.२ शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग,क्रमांकःडीसीएस-१०८९/२१४८/का. सेवा-३,दिनांक २५ एप्रिल, १९९० नुसार महाराष्ट्रातील सांविधिक विद्यापिठाकडून प्रदान करण्यात येणा-या विद्युत अभियांत्रिकी (इलेक्ट्रॉनिक्स व पॉवर) व इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टिम इंजिनिअरिंग या दोन पदव्या विद्युत अभियांत्रिकी पदवीशी समकक्ष समजण्यात येतील.

३.३ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

३.४ पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**४ शुल्क (फी )** :

४.१ प्रस्तुत परीक्षेंकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| **अ.क्र.** | **परीक्षेचे नांव** | **रुपये** | |
|---|---|---|---|
| | | **अमागास** | **मागासवर्ग** |
| (१) | सहायक अभियंता विद्युत, श्रेणी २ पूर्व परीक्षा | २६०/- | १३५/- |
| (२) | सहायक अभियंता विद्युत, श्रेणी २ मुख्य परीक्षा | ३१०/- | १६०/- |

४.२ वि.जा.(अ),भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात(क्रिमी लेअर)मध्ये मोडणाऱ्या म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ४.५ लाखांपेक्षा अधिक आहे, अशा उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.३ अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदांकरिता अर्ज करणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इ.मा.व. प्रवर्गातील महिला उमेदवारांपैकी उन्नत व प्रगत गटात ( क्रिमी लेअर )

मोडणाऱ्या, म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ४.५ लाखांपेक्षा अधिक आहे, अशा महिला उमेदवारांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.४ दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च,१९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर क रू न भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून,१९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**५ पूर्व परीक्षा** :

**५.१ परीक्षा योजना** :

(१) **प्रश्नपत्रिका** : एक

(२) **परीक्षेचे स्वरूप** :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी.

(३) **प्रश्नांची संख्या** : १५०

(४) **एकूण गुण** :- १५०

(५) **परीक्षेचा कालावधी** : दीड तास.

(६) **परीक्षेचे मानक (दर्जा)**: पदवी.

(७) **परीक्षेचे माध्यम** : इंग्रजी

**५.२ अभ्यासक्रम** :

**इंग्रजी व सामान्य अध्ययन** - ( **विषय संकेतांक - ९०१** )

(१) इंग्रजी - ५० गुण

Common Vocabulary, Sentence Structure, Grammer, Comprehension of Passage.

(२) सामान्य अध्ययन - २५ गुण

(A) History of Modern India (Special Reference to Maharashtra)

(B) Geography of India (Special Reference to Maharashtra)

(C) Indian Political System (With reference to Indian Constitution), Administration of State and Local Self Government (Rural and Urban)

(३) विद्युत अभियांत्रिकी संदर्भात सामान्य अध्ययन - ७५ गुण

Fundamentals of electrical engineering, DC and AC network theorems, Behavior of R-L, R-C and R-L-C circuits, Basics of Electromagnetism and electrostatics, Three phase circuits, power and energy in single phase and three phase circuits, Measurement of electrical parameters for sinusoidal and non sinusoidal systems. Single phase and three phase transformers, Distribution and Power Transformers, Instrument transformers, Basics of energy conversion, Construction, Working, Performance of DC machine, Induction machine and Synchronous machine. Parallel operation of transformers and Alternators, Power Generation scenario of the country and Maharashtra, P.U.Systems, Symmetrical and asymmetrical fault calculations, Selection of switchgear and protection devices, Relaying and coordination, Substation components, Earthing, grounding and lightning protection, AC-DC, DC-AC power converters, Power Quality issues, Reactive power compensation, Fundamentals of AC and DC drives, Energy saving using VSD's, Type and routine tests, field tests for electrical equipment such as transformers, motors, switchgear, insulators, cables, batteries etc and the relevant Indian Standards. Codes of electrification of buildings, DG, UPS selection, Basics of illumination systems, types of bulbs, lamps, etc. Non conventional energy sources, Economics of solar-thermal, solar-electrical systems, Energy conservation opportunities in fans, pumps, compressors, HVAC etc. Codes for electrical safety, and Fire fighting equipment and systems.

**५.३ परीक्षा केंद्र** :

(१) खालील चार ठिकाणी सदर परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

(२) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

(३) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

(४) विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

(५) एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

(६) एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.४ पूर्व परीक्षेचा निकाल** :

५.४.१ भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे १० पट उमेदवार उपलब्ध होतील अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line ) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी तसेच महिला,अपंग, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

५.४.२ केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

५.४.३ प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

५.४.४ अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर व आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

५.४.५ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

५.४.६ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा** :

**६.१ परीक्षेचे टप्पे** : **दोन** - लेखी परीक्षा व मुलाखत

**६.२ परीक्षेस प्रवेश** :

६.२.१ पूर्व परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या मर्यादेनुसार अर्हताप्राप्त होणा-या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

६.२.२ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या ईमेलद्वारे अथवा/व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन

पद्धतीने माहिती व परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

६.२.३ प्रस्तुत पदाच्या पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता मुख्य परीक्षेकरिता आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

६.२.४ पूर्व परीक्षेचा अर्ज करताना जातीचे, क्रिमिलेअर अथवा अपंगत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने केवळ अराखिव पदासाठी पूर्व परीक्षेच्या अर्जात दावा केलेल्या उमेदवारानें मुख्य परीक्षेकरिता आरक्षित पदांसाठी दावा केल्यास, तो कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही. तसेच वर्गवारीचा दावा बदलत आहे ही सबब मान्य केली जाणार नाही.

**६.३ परीक्षा योजना** :

**६.३.१ प्रश्नपत्रिकेचे स्वरूप** :- पारंपरिक.

**६.३.२ एकूण गुण** :- ६००

**६.३.३ प्रश्नपत्रिकांची संख्या** :- तीन. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | दर्जा | माध्यम | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ (संकेतांक २१) | विद्युत अभियांत्रिकी, पेपर-१ | २०० | विद्युत अभियांत्रिकी पदवी. | इंग्रजी | तीन तास |
| २ (संकेतांक २२) | विद्युत अभियांत्रिकी, पेपर-२ | २०० | विद्युत अभियांत्रिकी पदवी. | इंग्रजी | तीन तास |
| ३ (संकेतांक २३) | विद्युत अभियांत्रिकी, पेपर-३ | २०० | विद्युत अभियांत्रिकी पदवी. | इंग्रजी | तीन तास |

६.३.४ आयोगाकडून उमेदवारांना परीक्षेच्या वेळी पुरविण्यात येणा-या उत्तरपुस्तिकेमध्ये दिलेल्या पृष्ठांवरच उत्तरे नमूद करणे आवश्यक आहे. मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुरवणी उत्तरपुस्तिकेचा पुरवठा करण्यात येणार नाही.

**६.४ अभ्यासक्रम** :

सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**६.५ परीक्षा केंद्र** :

(१) खालील चार ठिकाणी सदर परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

**(२)** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र मुख्य परीक्षेकरिता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**(३)** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**(४)** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**(५)** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**(६)** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.६ लेखी परीक्षेचा निकाल** :-

६.६.१ पारंपारिक स्वरुपाच्या उत्तरपत्रिकेमध्ये उमेदवाराने प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना (अ, ब, क, ड किंवा १, २, ३, ४ ) सलगरित्या सोडवावे. प्रश्नाचा एक भाग एका पानावर, तर दुसरा भाग कही पृष्ठे सोडून अथवा काही अन्य पृष्ठावर उपप्रश्न सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येईल व अशा प्रश्नांच्या उत्तरांना शून्य गुण समजण्यात येतील.

६.६.२ भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे २ ते ३ पट उमेदवार मुलाखतीकरिता उपलब्ध होतील अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line ) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी तसेच महिला,अपंग, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

६.६.३ प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी मुख्य परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

६.६.४ अमागास उमेदवाराकरिता लेखी परीक्षेमध्ये किमान ३५% गुण, तर मागास उमेदवाराकरिता किमान ३०% गुण प्राप्त होणे आवश्यक राहील. तसेच, माजी सैनिक, अपंग व गुणवत्ताधारक पात्र खेळाडूंकरिता लेखी परीक्षेमध्ये किमान २०% गुण प्राप्त होणे आवश्यक राहील. तथापि, उमेदवारास वरीलपैकी कोणतीही एकच सवलत मिळेल.

६.६.५ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे अथवा /व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तसेच लेखी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल.

६.६.६ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच अपंग, महिला, माजी सैनिक व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**६.७ मुलाखत** :-

६.७.१ वरील परिच्छेद क्र. ६.६ (२) नुसार उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखत १०० गुणांची असेल

६.७.२ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल. विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

६.७.३ वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाचा आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येतील.

**६.८ अंतिम निकाल** - लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**६.९ शिफारस** :-

(१) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**"मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

(२) मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर शक्य तितक्या लवकर, त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही ते कळविण्यात येईल व शिफारस झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील.

************